# महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई
# Maharashtra Council of Acupuncture

202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg, Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

जा.क्र.मॲप/परिपत्रक/ ५४५ /२०२६ दिनांक : २९/०६/२०२६

**परिपत्रक**

विषय : राष्ट्रीय "ॲक्युकॉन-२०२६" (ACUCON-२०२६) परिषदेस उपस्थित राहण्याबाबत.

प्रिय मित्रांनो आणि व्यावसायि सहकाऱ्यांनो,

महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेच्या स्थापनेनंतर, १ जानेवारी २०२० पासून परिषदेच्या अविरत कार्याची यशस्वी घोडदौड सुरू झाली. सन २०२१-२२ व २०२२-२३ या कोरोनाच्या अत्यंत भयावह काळातही परिषदेचे कार्य अविरत सुरू होते. अधिनियमातील तरतुदींनुसार, परिषदेने ॲक्युपंक्चर व्यावसायिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी केली, पात्रता परीक्षा घेतली आणि जवळपास ४,९०० व्यावसायिकांना नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करून त्यांच्या अधिकृत व्यवसायाचा मार्ग मोकळा केला.

तसेच, नियमांनुसार निरंतर ॲक्युपंक्चर केंद्रांना मान्यता देऊन, 'निरंतर ॲक्युपंक्चर शिक्षण' (Continuous Acupuncture Education) झपाट्याने सुरू केले. यामुळे व्यावसायिकांच्या ज्ञानात वृद्धी होऊन त्यांच्या व्यवसायाला स्थिरता लाभली आहे. परिषदेच्या अधिनियमातील तरतुदींनुसार आणि शासनाच्या निर्देशानुसार, राज्यात आतापर्यंत १९ संस्थांना ॲक्युपंक्चर पदविका (Diploma) अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देण्यात आली असून, त्यासाठी आवश्यक अध्यापकांनाही मान्यता देण्यात आली आहे.

राष्ट्रीय "ॲक्युकॉन-२०२६" (ACUCON-२०२६) चे आयोजन

महाराष्ट्र राज्यात ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धतीची सुरू झालेली ही घोडदौड संपूर्ण देशात व जगभरात पसरावी, या उद्देशाने महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेच्या अधिपत्याखाली राज्यातील व देशातील पहिली मान्यताप्राप्त राष्ट्रीय स्तरावरील "ACUCON-२०२६" अक्यूपंक्चर कॉन्फरन्स आयुषमानस ॲक्युपंक्चर कॉलेज, नागपूर यांच्या सहकार्याने दिनांक ११ व १२ जुलै,२०२६ रोजी नागपुर येथे आयोजित केली आहे.

या परिषदेस राज्याचे मा. मुख्यमंत्री व परिषदेचे प्रेरणास्थान मा. श्री. **देवेंद्रजी फडणवीस साहेब**, अनेक मंत्री महोदय आणि उच्चपदस्थ अधिकारी, उपस्थित राहणार आहेत. **ॲक्युपंक्चर क्षेत्रात "न भूतो न भविष्यती" असा हा ऐतिहासिक उत्सव संपन्न होत आहे.**

आपणा सर्वांना नम्र आवाहन करण्यात येते कि, ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धतीचा एक महत्त्वाचा घटक म्हणून राज्यातील व देशातील जास्तीत जास्त ॲक्युपंक्चर व्यावसायी, सर्व मान्यताप्राप्त अध्यापक, नामांकित वक्ते, संस्थाप्रमुख आणि विद्यार्थ्यांनी या परिषदेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**आपणांस कळविण्यास आनंद होतो कि परिषदेने वर्ष २०२५ चे श्रेयांक तास अपुर्ण असणाऱ्या व्यावसायीकांना या कॉन्फरन्सच्या माध्यमातुन श्रेयांक तास पुर्ण करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच २०२६ मध्ये ६ श्रेयांक तास पुर्ण झालेल्या व्यवसायींचे कॉन्फरन्सच्या माध्यमातुन मिळणारे अतिरिक्त तास २०२७ मध्ये गणण्याचा निर्णय घेतला आहे.**

परिषदेस उपस्थित राहणाऱ्या राज्यातील व राज्याबाहेरील इच्छुकांची संख्या मोठी असून परिषदेसाठी उपलब्ध आसनांची संख्या मर्यादित आहे. त्यामुळे संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी आजच आपली नोंदणी (Registration) निश्चित करा आणि या सुवर्णसंधीचा लाभ घ्या !

आपला नम्र,

(नारायण नवले)
प्रबंधक
महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद